Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- I JANUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतातील पारसी धर्माच्या लोकसंख्येचा एक भौगोलिक अभ्यास

**सहा.प्रा. शहाजी गंगाराम मरशिवणे**
भूगोल विभाग
कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,
उदगीर जि. लातूर

**प्रस्तावना :**

*लोकसंख्या भुगोल ही मानवी भुगोलाची महत्वाची शाखा आहे. लोकसंख्या भुगोलात मानवी लोकसंख्या शास्त्रीय घटकांचा अभ्यास केला जातो. उदा. जन्मदर, मृत्युदर, लोकसंख्या वाढ, लोकसंख्येचे धर्मलिहाय वितरण, सक्षरता दर आणि स्त्री-पुरुष प्रमाण इ.*

*आज लोकसंख्या वाढ ही एक वैश्विक समस्या बनत चाललेली आहे. कारण जगाची एकुण लोकसंख्या ०८ (आठ) अब्जाच्या जवळपास पोहचलेली असुन एवढया मोठया लोकसंख्येच्या अन्नविषयक आणि इतर महत्वाच्या गरजा भागविणे गरजेचे असते. भारताची एकुण लोकसंख्या १३६ कोटीच्या (जुन २०१९ पर्यंत) जवळपास आहे.* (Source: worldmeter.com) *जी जगाच्या एकुण लोकसंख्येच्या १८ टक्केच्या जवळपास असुन जगाच्या एकुण क्षेत्रफळाच्या २.४ टक्के प्रमाणाच्या तुलनेत कितीतरी अधिक पटींनी आहे. ज्यामुळे भविष्यात भारतातील लोकांच्या गरजा भागविणे अवघड होत जाणार आहे.*

*धर्म म्हणजे माणसाने स्विकारलेली एक विशिष्ट विचारसरणी होय. प्रत्येक धर्माचे स्वतःचे जीवन विषयक तत्वज्ञान असते. प्रत्येक धर्माच्या अनुयायांना जीवनाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टीकोन असतो. जगातील सर्व धर्म कुटुंब नियोजनाच्या विरोधात आहेत. विशेषतः इस्लाम धर्म व ख्रिश्चन धर्मातील कॅथलिक पंथीय कुटुंब नियोजनाला तीव्र विरोध करतात व आपत्यजन्म थांबविणे पाप मानतात. थोडक्यात समाजावरील धार्मिक पगडयानुसार जन्मदरांमध्ये भिन्नता आढळते. उदा. भारतात राहणारे हिंदु व मुस्लिम एकाच प्रकारच्या पर्यावरणात राहत असले तरी त्यांच्यातील जन्मदरात फरक आहे. उदा. १९६१ साली हिंदुची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या ८३.४८ टक्के आणि मुस्लीम धर्माची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या १०.६९ होती ती १९८१ साली हिंदु धर्माची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या ८२.६ टक्के तर मुस्लिम धर्माची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या ११.४ टक्के झाली म्हणजेच हिंदु आणि मुस्लिमांच्या जन्मदरात फरक असलेला दिसून येतो.*

**अभ्यास क्षेत्र :**

*भारत उत्तरपूर्व गोलार्धात दक्षिण आशिया खंडात स्थित असुन भारताचा अक्षवृत्तीय विस्तार ८°४'२५'' ते ३७°६'५३'' उत्तर अक्षवृत्ता दरम्यान पसरलेला असुन भारताचा रेखावृत्तीय विस्तार ६८°७'३३'' ते ९७°२५'४७'' पुर्व रेखावृत्त दरम्यान* पसरलेला आहे. भारताच्या मध्यातून २३°३०' उत्तर अक्षवृत्त म्हणजेच कर्कवृत्त गेले आहे. जगातील एकूण क्षेत्रफळाच्या २.४६ टक्के एवढा प्रदेश भारताने व्यापला असुन क्षेत्रफळानुसार भारताचा सातवा क्रमांक लागतो.

**उद्देश :**

- भारतातील परसी धर्माच्या लोकसंख्येचा आढावा घेऊन संख्यात्मक विश्लेषण करणे.
- धार्मिक रुढी आणि परंपरा तसेच शिक्षणाचा जन्मदरावर किंवा लोकसंख्येच्या वृध्दीवर होणारा परिणाम अभ्यासणे.
- भारतातील कमी होणाऱ्या पारसी धर्माच्या लोकसंख्येवर सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा घेणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत व अभ्यास पध्दती :**

भारतातील पारसी धर्माच्या लोकसंख्येच्या विश्लेषणासाठी दुय्यम आकडेवारीचा आधार घेतला असुन द्वितीयक सामुग्रीमध्ये भारत सरकारद्वारा तयार करण्यात आलेल्या आतापर्यंतच्या जनगणना अहवाल तसेच विविध मासिके, वर्तमानपत्र आणि संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आलेला असून मिळालेल्या आकडेवारीच्या सहाय्याने सांख्यिकीय पध्दतीने विश्लेषण केलेले आहे.

**विषय विवेचन :**

''धर्मनिहाय लोकसंख्या म्हणजे एका विशिष्ट प्रदेशात धर्मानुसार वास्तव्यास असलेल्या अनुयायांची संख्या होय.''


जागतीक पातळीवरील धर्मनिहाय लोकसंख्येचा विचार करता २०१२ नुसार सर्वाधिक लोकसंख्या ही ख्रिश्चन धर्माची असुन ती जगाच्या एकुण लोकसंख्येच्या ३१.८ टक्के इतकी आहे

तर त्याखालोखाल अनुक्रमे मुस्लिम २४.४ टक्के धर्म न सांगणारे १५.४ टक्के, हिंदु १५.० टक्के, बुध्दीष्ट ६.७ टक्के आणि स्थानविशिष्ट असे स्थानिक धर्म ५.७ टक्के या धर्माच्या लोकसंख्येचा क्रमांक लागतो.

भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येचा विचार करता २०११ नुसार सर्वाधिक लोकसंख्या हिंदु धर्माची असुन ती एकुण लोकसंख्येच्या ७९.८० टक्के इतकी आहे तर त्याखालोखाल मुस्लिम १४.२३ टक्के, ख्रिश्चन २.३० टक्के, शिख १.७२ टक्के, बुध्दीष्ट ०.७० टक्के, जैन ०.३७ टक्के, इतर धर्म ०.६६ टक्के आणि धर्म न सांगणारे ०.२४ टक्के या धर्माच्या लोकसंख्येचा क्रमांक लागतो. इतर धर्मात पारसी (ज्या धर्माची एकूण लोकसंख्या केवळ ५७२६४ इतकी असून) आणि इतर धर्माचा समावेश होतो.

जागतिक पातळीवरील पारसी धर्माच्या लोकसंख्येचा विचार करता भारतातच सर्वाधिक (५७२६४) लोकसंख्या वास्तव्यास आहे आणि जी भारताच्या एकुण लोकसंख्येच्या ०.१ टक्के पेक्षाही कमी आहे आणि ही चिंतेची बाब आहे. एवढेच नव्हे तर भारतातील पारसी लोकसंख्या ही उत्तरोत्तर कमी होत असल्याचे दिसुन येते हे खालील आकडेवारीत निदर्शनात आणता येईल.

| जनगणना वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकुण लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९०१ | - | - | ९४१४० |
| १९११ | ५११२३ | ४८९७३ | १०००९६ |
| १९२१ | ५२३५५ | ४९४२३ | १,१७,७८० |
| १९३१ | ५६३६६ | ५२९६३ | १,०९,३२९ |
| १९४१ | ५८२४८ | ५६६४२ | १,१४,८९० |
| १९५१ | ५६१३७ | ५५६५४ | १,११,७९१ |
| १९६१ | ४९४२५ | ५१३४७ | १,००७७२ |
| १९७१ | ४४८०३ | ४६४६३ | ९१,२६६ |
| १९८१ | ३५३२८ | ३६३०२ | ७१६३० |
| १९९१ | ३७७३६ | ३८६४६ | ७६३८२ |
| २००१ | ३३९४९ | ३५६५२ | ६९६०१ |
| २०११ | २८११५ | २९१४९ | ५७२६४ |




वरिल आकडेवरीचे विश्लेषण करता आपणास असे दिसुन येते की, स्वातंत्र्यानंतर भारतातील पारसी लोकसंख्या कमी होताना दिसुन येते. १९८१ साली सर्वाधिक म्हणजे -२७ टक्के ऋणात्मक वृध्दीदर होता तर २००१ ते २०११ दरम्यान पारसी लोकसंख्येचा ऋणात्मक वृध्दीदर -२२ टक्के होता. जो १९८१ सालापासून सर्वात कमी वृध्दी आहे आणि ही एक आनंदाची बाब आहे. असे असले तरीही एखाद्या धर्माची किंवा पंथाची लोकसंख्या कमी होणे म्हणजे त्या धर्माची संस्क़ती, रुढी आणि परंपरा तसेच जनुकीय विविधता लुप्त होण्याकडे आणि ही एक खेदाची बाब आहे.


**पारसी धर्माची लोकसंख्या कमी होण्याची कारणे :**

भारतातील पारसी धर्माच्या लोकसंख्येचा कमी जन्मदर, शिक्षणाचे प्रमाण अधिक, स्थलांतर, लग्नाचे वाढते वय, स्वत:च्या पंथाचे पावित्र्य जपण्यासाठी पारसी लोक आंतरजातीय विवाह करीत नाहीत ते एकमेकांच्या नातलगासोबतच विवाह करतात इ. कारणांमुळे भारतातील पारसी लोकसंख्या कमी होताना दिसत आहे.

**भारतातील पारसी लोकसंख्येचे राज्यनिहाय वितरण (२०११ नुसार) :**

भारतातील पारसी धर्माची लोकसंख्या जवळपास शहरी भागामध्येच वास्तव्यास आहे. पारसी धर्माच्या लोकसंख्येचे राज्यनिहाय वितरण खालील प्रमाणे सांगता येते.

| अ.क्र. | राज्याचे नाव | लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | ४४,८५४ |
| २ | गुजरात | ९,७२७ |
| ३ | आंध्रप्रदेश | ६०९ |
| ४ | कर्नाटक | ४४३ |
| ५ | पश्चिम बंगाल | २९१ |
| ६ | मध्यप्रदेश | २६३ |
| ७ | दिल्ली | २२१ |
| ८ | झारखंड | १८८ |
| ९ | तामिळनाडू | १२७ |



वरील आकडेवारीचे विश्लेषण करता आपणास असे दिसुन येते की जवळपास ८० टक्के पेक्षाही अधिक लोकसंख्या महाराष्ट्रात वास्तव्यास असून त्याखालोखाल गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश, दिल्ली, झारखंड आणि तामिळनाडू या राज्यांचा क्रमांक लागतो आणि ही लोकसंख्या जवळपास शहरी भागातच वास्तव्यास असल्याचे दिसुन येते.

**निष्कर्ष :**

भारतातील पारसी धर्माची लोकसंख्या १९४१ पासुन सतत कमी होताना दिसते. ही लोकसंख्या कमी होवू नये म्हणुन भारताच्या अल्पसंख्यांक मंत्रालयाद्वारे सप्टेंबर २०१३ मध्ये जियो पारसी योजना (Jiyo Parsi Scheme) चालु करण्यात आली आहे. त्या योजनेची काळजीपूर्वक अंमलबजावणी करावी लागेल तसेच Parxor Foundation द्वारा केल्या जाणाऱ्या प्रयतनांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि पारसी लोकांचा जन्मदर कसा वाढेल याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

***संदर्भ ग्रंथ :***

१) www.censusofindia.com
२) India Today newspaper
३) The Hindu newdpaper
४) Economic Times Newspaper
५) Govt. of India, Ministry of minority affairs website
६) *लोकसंख्या भुगोल – डॉ. विठ्ठल घाटपुरे*
७) Population Geography – Dr. R.C. Chabdana
८) *लोकसंख्या आणि वस्ती भुगोल – प्रा. मुसमाडे, प्रा. सोनवणे, प्रा. मोरे*